महाराष्ट्र शासन

# शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

पत्ता : प्लॉट क्र.एच.०८/०९/०५, एम.आय.डी.सी.परिसर, जळगाव - ४२५ ००१
दुरध्वनी क्र.०२५७-२२२००२५

ई-मेल : gdchjalgaon@gmail.com
संकेतस्थळ : www.gdchjalgaon.ac.in

जा.क्र.शादंमरुज/संकीर्ण/उपहारगृह/निविदा/ 1599 /२६ दिनांक : 05/10/2026

## निविदा / दरपत्रक सूचना

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील उपहारगृहे व भोजनालय ११ महिन्यांच्या करार कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी देण्याकरिता विद्यार्थी संघटना / कामगार संघटना / खाजगी पुरवठादार / पात्र व्यक्ती / संस्था यांचेकडून मोहोरबंद दोन लिफाफा पद्धतीने खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून निविदा / दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | उपहारगृहाचे नाव | निविदा फॉर्मची किंमत (ना-परतावा) |
|---|---|---|
| १ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील महाविद्यालय उपहारगृह व भोजनालय | रु.५००/- |
| २ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | रु.५००/- |
| ३ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थीनी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | रु.५००/- |

१. रोखाशाखा, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांचेकडे निविदा फॉर्मची किंमत प्रत्येकी रु.५००/- ( अक्षरी रुपये पाचशे फक्त ) भरणा करुन सदरील निविदा फॉर्म कार्यालयातील संकीर्ण विभागाकडून मिळतील.

२. निविदेच्या अटी व शर्ती निविदेसोबत पुरविण्यात येतील. कोऱ्या निविदा संकीर्ण विभाग, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे दि.०५.१०.२०२६ ते १४.१०.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत ( सुट्टीचे दिवस वगळून ) सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत ना-परतावा रोख रक्कम भरल्यानंतरच मिळतील.

३. मोहोरबंद तांत्रिक लिफाफा क्र.१ मध्ये खालीलप्रमाणे दस्ताऐवज जोडणे आवश्यक आहे.
   १. अन्न व औषधी प्रशासन यांचेकडे नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र ( अद्ययावत व वेळोवेळी नुतनीकरण केलेले )
   २. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना नोंदणी प्रमाणपत्र
   ३. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र
   ४. पॅन कार्ड
   ५. रु.५०००/- अनामत रकमेचा धनाकर्ष ( डीमांड ड्राफ्ट )
   ६. उपहारगृह व भोजनालय पाणी व वीज वापरापोटी दरमहा भरावयाचे भाडेसाठी हमीपत्र
   ७. सहकारी संस्था / विद्यार्थी संघटना / कर्मचारी संघटना असल्यास नोंदणी प्रमाणपत्र ( लागू असल्यास )
   ८. शासकीय कार्यालयामध्ये काम केलेले असल्यास अनुभव प्रमाणपत्र ( वैकल्पिक )

४. मोहोरबंद लिफाफा क्र.२ मध्ये जेवण व खाद्यपदार्थांचे दर भरणे आवश्यक राहील. दरसूचीत नमुद करण्यात आलेल्या खाद्यपदार्थांचेच दर, वजन व नगानुसार भरणे आवश्यक आहे. निविदेत नमुद न करण्यात आलेल्या इतर खाद्यपदार्थांचे दरपत्रक सादर करु नये. तसेच सदरील दर संस्थेच्या लेटरहेडवर टंकलिखित करुन सादर करावेत, हस्तलिखित / पेनाने भरलेले दरपत्रक रद्द करण्यात येतील व त्याबाबत करण्यात येणारी विनंती मान्य करण्यात येणार नाही.

५. उपरोक्त दोन्ही लिफाफे भरुन त्यावर **लिफाफा क्र.१ -तांत्रिक लिफाफा** व **लिफाफा क्र.२ - दरपत्रक** लिहून तिसऱ्या मोठ्या लिफाफ्यात मोहोरबंद करुन सादर करावेत.

६. वर दर्शविल्याप्रमाणे निविदा मोहोरबंद लिफाफ्यातून मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांच्या कार्यालयातील आवक शाखेत दि.१४.१०.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सादर करावेत.

७. मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांनी निविदा स्विकारणे अथवा नाकारणे, निविदा प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार राखून ठेवलेला आहे.

८. ११ महिन्यांचा करार कालावधी पुर्ण झाल्यानंतर ठेकेदाराचा मेसचा दर्जा समितीस योग्य वाटल्यास पुढील मुदतवाढ देण्यासंदर्भात उचित निर्णय घेण्यात येईल.

९. महाविद्यालय, विद्यार्थी वसतिगृहातील व विद्यार्थीनी वसतिगृहातील उपहारगृह व भोजनालयासाठी तीन स्वतंत्र निविदा सादर करण्यात याव्यात.

१०. निविदा प्रपत्र, दरसूची, हमीपत्र इ.टंकलिखित करुन सादर करावेत.

११. सदरील मोहोरबंद निविदा दि.१५.१०.२०२६ रोजी दुपारी ०२:०० वा. बैठक कक्ष, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथे उघडण्यात येतील. तांत्रिक लिफाफा क्र.१ मधील कागदपत्रे, अटी व शर्तींची पुर्तता करणाऱ्या पुरेशा निविदा धारकांचा लिफाफा क्र.२ शक्य असल्यास त्याच दिवशी उघडण्यात येतील. मोहोरबंद निविदा उघडण्याच्या प्रक्रियेत निविदाधारकांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना सहभागी व्हावयाचे असेल तर त्यांनी स्वखर्चाने वेळेवर उपस्थित रहावे.

(डॉ.जगदीशचंद्र वठार)
अधिष्ठाता,
शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय,
जळगाव

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

## परिशिष्ट - अ

## निविदेच्या अटी व शर्ती

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या संस्थेच्या अधिपत्याखालील महाविद्यालय, विद्यार्थी वसतिगृह व विद्यार्थीनी वसतिगृहातील उपहारगृह व भोजनालय ११ महिन्यांच्या करार कालावधीसाठी भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी देणेकरिता खालीलप्रमाणे नियम, अटी व शर्ती आहेत.

| अ.क्र. | नियम, अटी व शर्ती |
|---|---|
| १ | सदरील उपहारगृह व भोजनालय हे शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या संस्थेच्या अधिपत्याखालील संस्थेच्या आवारातील व संस्थेच्या वसतिगृहांमधील आहेत. |
| २ | उपहारगृह व भोजनालयासाठी वापरण्यात येणाऱ्या भाज्या, कडधान्ये, डाळी, तेल, तुप, खाद्यपदार्थ व कच्च्या मालाचा दर्जा उत्तम प्रतीचा व चांगला राहील व चांगल्या प्रतीचे भोजन तयार करण्यात येईल याची खबरदारी घ्यावी. उपहारगृह व भोजनालय समिती व संस्थेने प्राधिकृत केलेले अधिकारी - कर्मचारी सदरहु बाबतीत याचे वेळोवेळी निरीक्षण व तपासणी करेल. तसेच याबाबतीत तक्रारी प्राप्त झाल्यास गंभीर दखल घेतली जाईल. |
| ३ | नाश्ता व भोजनाचा दर्जा व इतर गोष्टींची पुर्तता तसेच स्वच्छता राखण्याची जबाबदारी ठेकेदाराची असेल. अन्न / खाद्यपदार्थ हे उघडे ठेवण्यात येऊ नये. |
| ४ | विद्यार्थ्यांच्या जेवणासाठी व नाश्त्यासाठी आवश्यक असणारी भांडी, टेबल, खुर्च्या ठेकेदारास आणावी लागतील. |
| ५ | उपहारगृह व भोजनालय येथे काम करण्यासाठी कामगार ठेवणे व त्यांचा पगार देणे याची सर्वस्वी जबाबदारी उपहारगृह व भोजनालय ठेकेदारावर राहील. चौदा वर्षाखालील बालकामगार ठेवता येणार नाही. |
| ६ | उपहारगृह व भोजनालयाची सुरक्षा व्यवस्था भोजनालय चालकाने स्वत: ठेवावी. |
| ७ | भोजनालयाची पाणी पट्टी सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी ठरविल्याप्रमाणे किंवा रु.५००/- प्रती महिना व विद्युत शुल्क रु.७००/- किंवा वीज सबमीटर प्रमाणे ( प्रती उपहारगृह व भोजनालय ) प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेपर्यंत भोजनालय ठेकेदाराने कार्यालयात भरुन पावतीची छायाप्रत प्रशासकीय कार्यालयातील संकीर्ण विभागात सादर करावी लागेल. सदर भाडे तीनही उपहारगृहांसाठी स्वतंत्रपणे भरणा करावे लागेल. |
| ८ | विद्यार्थ्यांबद्दल काही तक्रारी असल्यास परस्पर कारवाई न करता मा.अधिष्ठाता, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार करावी अन्यथा तक्रार ग्राह्य धरण्यात येणार नाही. |
| ९ | सदर उपहारगृह व भोजनालय हे अकरा ( ११ ) महिन्यांच्या करार कालावधीसाठी भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी दिले जाईल. त्याबाबतचा करारनामा रु.१००/- स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. ११ महिन्यांच्या कालावधीनंतर हा करारनामा आपोआप संपुष्टात येईल. |
| १० | जेवणात दिवसातुन एकदा एक पालेभाजी व एक कडधान्य असावे परंतु कुठल्याही भाजीची एकाच दिवसात पुनरावृत्ती करु नये. सोयाबिनची भाजी करु नये. |
| ११ | प्रत्येक विद्यार्थ्याकडून जेवणाचा / नाश्त्याचा खर्च आगाऊ स्वरुपात घेण्यात यावा व विद्यार्थ्यांकडून पैसे / उधारी वसूल करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील. |

| | |
|---|---|
| १२ | ठेकेदार चालविणार असलेली मेस/उपहारगृह हे अन्न व औषध प्रशासन विभाग यांनी घालून दिलेल्या प्रमाणकानुसार चालवावे लागेल. |
| १३ | दुपारच्या जेवणात कडधान्ये व रात्रीच्या जेवणात पालेभाजी असावी. दोन्ही वेळेस सलाड किंवा दही, चटणी व लोणचे असावे |
| १४ | आठवड्यातून एकदा फिस्ट असावी. त्यामध्ये गोड पदार्थ, गुलाब जामुन, श्रीखंड, रसगुल्ले, जिलेबी असावी. फीस्टच्या दिवशी संध्याकाळी जेवण देण्यात यावे त्यामध्ये कढी-खिचडी, पापड अथवा लोणचे असावे. |
| १५ | उपहारगृह व भोजनालय कुठलीही पुर्वसूचना न देता कोणत्याही क्षणी बंद करणे किंवा कंत्राट काढून घेणे, करार रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता यांनी राखून ठेवलेले आहे. |
| १६ | कुठल्याही सणाच्या / उत्सवाच्या दिवशी उपहारगृह बंद ठेवू नये. पुर्व सूचना न देता उपहारगृह व भोजनालय बंद करता येणार नाही. |
| १७ | ठेकेदाराने स्वंयपाकासाठी घरगुती गॅस वापरु नये, वापरल्यास योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. व्यावसायिक गॅस कनेक्शन घेण्यात यावे,त्यासाठी स्वत: व्यवस्था करावी लागेल. |
| १८ | ठेकेदाराला उपहारगृह व भोजनालय दुसऱ्याला/ पोटभाडेकरुस चालविण्यासाठी देता येणार नाही. |
| १९ | उपहारगृह व भोजनालयामध्ये काम करणाऱ्या कामगारांना वेटरचा ड्रेस बंधनकारक राहील, तसेच उपहारगृह व भोजनालयामध्ये काम करणाऱ्या कामगारांना ओळखपत्र तयार करुन घ्यावे लागेल. |
| २० | दर महिन्यातुन एकदा उपहारगृह व भोजनालय समितीची बैठक घेण्यात येईल |
| २१ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन परिपत्रक क्र.शापोआ-२०१६/प्र.क्र.२४३/एस.डी.३ दि.०८.०५.२०१७ नुसार HFSS Food ( High fat, salt & sugar ) उपहारगृहात ठेवण्यास व विक्री करण्यास प्रतिबंध असेल. तसेच शासनाने निर्बंध घातलेले पेय व फास्ट फुड ठेवता येणार नाही. |
| २२ | अन्न व औषधी प्रशासन यांच्या प्रयोगशाळेतून खाद्यपदार्थांची वेळोवेळी तपासणी करुन घ्यावी लागेल. |
| २३ | ठेकेदारास प्रती उपहारगृह व भोजनालयासाठी रु. ५०००/- ( अक्षरी रुपये पाच हजार फक्त ) अनामत रक्कम म्हणून कार्यालयातील रोखा शाखेत ठेवावी लागेल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय उपहारगृह व भोजनालय चालु करता येणार नाही. ११ महिन्यांच्या करार कालावधीत आपणाकडून इमारतीचे नुकसान झाल्यास, तोडफोड झाल्यास किंवा आपणाकडे काही देणे बाकी असल्यास सदरील अनामत रकमेतून ते वसूल करण्यात येईल. कराराची मुदत संपण्यापुर्वी उपहारगृह व भोजनालय बंद केल्यास अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| २४ | महाविद्यालय, विद्यार्थी वसतिगृह व विद्यार्थीनी वसतिगृहातील उपहारगृहांसाठी निविदाकारांनी स्वतंत्रपणे निविदा सादर करावी, सदरील तीन उपहारगृहांचे निविदा मुल्यांकन स्वतंत्रपणे करण्यात येईल व तीन उपहारगृहासांठी वेगवेगळे कार्यादेश देण्यात येतील. |
| २५ | महाविद्यालय उपहारगृह व भोजनालय वेळ : सकाळी ०८: ०० ते सायंकाळी ०६:०० वाजेपर्यंत<br>विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृहातील उपहारगृह व भोजनालय वेळ : सकाळचा नाश्ता व चहा - सकाळी ०६: ३० ते सकाळी १० : ०० वा., दुपारचे जेवण - दुपारी १२:३० ते ०२ : ३० वा., सायंकाळचा नाश्ता व चहा - दु.०४:३० ते ०७ : ०० वा., रात्रीचे जेवण - ०७:३० ते १० : ०० वा., चहा कॉफी व दुध - रात्री १०:०० वाजेपर्यंत. या वेळेत सुरु ठेवावे लागेल. |
| २६ | उपहारगृह व भोजनालयात काम करणाऱ्या कामगारांनी नियमित किमान ३ महिन्यांतून एकदा आरोग्य तपासणी करुन त्याचा अहवाल वेळोवेळी प्रशासनास सादर करणे बंधनकारक राहिल. |

| | |
|---|---|
| २७ | उपहारगृह व भोजनालयामध्ये ठेकेदाराने अग्निशामक उपकरणे स्वखर्चाने ठेवावी व हाताळावी लागतील. |
| २८ | उपहारगृह व भोजनालयात कोणतीही दुर्घटना झाल्यास किंवा भोजनालयातील कामगारास दुखापत / जिवितहानी / मृत्यू झाल्यास सदरची नुकसान भरपाई मोबदला देण्याची सर्वस्वी जबाबदारी ही भोजनालय ठेकेदाराची राहिल. त्याचप्रमाणे सदर प्रकरणी न्यायालयीन बाबी अथवा वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी भोजनालय व उपहारगृह ठेकेदाराची राहिल. त्या अनुषंगाने नियमानुसार भोजनालयात कार्यरत कामगारांचा योग्य तो विमा उतरविण्याची जबाबदारी भोजनालय ठेकेदाराची राहिल. याबाबत शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव कोणतीही जबाबदारी घेणार नाही, याची नोंद घ्यावी. |
| २९ | निविदेमध्ये जो आहार जाहिर करण्यात आलेला आहे तो आहार देणेबाबत निविदाधारकाने दक्षता घ्यावी. |
| ३० | उपहारगृह व भोजनालयात आहार पुरविताना उत्तम दर्जा राखणे आवश्यक आहे. तसेच अन्नातून विषबाधा / जिवितहानी, अपाय झाल्यास त्यास संबंधित उपहारगृह व भोजनालय ठेकेदार जबाबदार राहिल, याची नोंद घ्यावी. |
| ३१ | दररोजच्या जेवणात खालील पदार्थांचा प्रामुख्याने समावेश असणे आवश्यक / बंधनकारक राहील.<br>१. नाश्ता : पोहे, उपमा, इडली, पराठा, ब्रेड, शिरा, वडापाव, अंडा आम्लेट, उपवासाची खिचडी, साबुदाना वडा, मिसळ, समोसा, आलुपराठा, चहा, चहा स्पेशल, कॉफी, गरम दुध साखरेसह.<br>२. जेवण : चपाती, भात, वरण, सलाड किंवा दही, दोन भाज्या पैकी एक सुकी व एक पातळ. ( जेवण - सर्व पोटभर )<br>टीप: अ) शाकाहारी जेवण करणाऱ्यांना दर रविवारी अथवा समिती ठरवून देईल त्यादिवशी दररोजच्या जेवणाव्यतिरिक्त स्वीट देणे ( रात्री )<br>ब) मासांहारी जेवण करणाऱ्यांना दर रविवारी अथवा समिती ठरवून देईल त्यादिवशी मटन/चिकन/अंडाकरी थाळी देणे ( रात्री ) |

वरीलप्रमाणे निविदेच्या सर्व अटी व शर्ती मला मान्य असून त्या माझ्यावर बंधनकारक राहतील व त्याचे मी तंतोतंत पालन करीन, त्याबाबत मी खालील स्वाक्षरी करुन निविदा सादर करीत आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी : ...............................

निविदाधारकाचे संपुर्ण नाव : ............................

फर्मचे नाव व शिक्का : ...................................

निविदा फार्म क्र. :
शासकीय पावती क्र.:
निविदा किंमत : रु.५००/-
दि. : / /२०२६

## शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

## निविदा फॉर्म

( मुळ निविदा फॉर्म लिफाफ क्र. २ सोबत परत करणे )

| अ.क्र. | विवरण | कालावधी व ठिकाण |
|---|---|---|
| १ | निविदा फॉर्म विक्री व जमा करावयाचा दिनांक व वेळ | दि. ०५/१०/२०२६ ते १४/१०/२०२६<br>वेळ : सायंकाळी ०५ : ०० वाजेपर्यंत |
| २ | निविदा दाखल करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १४/१०/२०२६<br>(सायंकाळी ०५ : ०० वाजेपर्यंत) |
| ३ | निविदा ( तांत्रिक लिफाफा ) उघडण्याची तारीख | दि. १५/१०/२०२६<br>वेळ : दुपारी ०२ : ०० वाजता |
| ४ | निविदा फॉर्म मिळण्याचे ठिकाण | प्रशासकीय कार्यालय, ( संकीर्ण विभाग ) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव |
| ५ | निविदा दाखल करण्याचे ठिकाण | प्रशासकीय कार्यालय, ( आवक शाखा ) शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव |
| ६ | निविदा उघडण्याचे ठिकाण | बैठक कक्ष, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव |
| ७ | संस्थेचे संकेतस्थळ | https:// gdchjalgaon.ac.in |

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालये चालविण्यासाठी निविदा फक्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी वैध राहतील.

| अ.क्र. | तपशिल | दर |
|---|---|---|
| १ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील महाविद्यालय उपहारगृह व भोजनालय | उपहारगृह व भोजनालयातील पदार्थांची नावे व दर वजनासह या सोबत जोडावे व निविदा प्रपत्र जोडावे. |
| २ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | उपहारगृह व भोजनालयातील पदार्थांची नावे व दर वजनासह या सोबत जोडावे व निविदा प्रपत्र जोडावे. |
| ३ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थीनी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | उपहारगृह व भोजनालयातील पदार्थांची नावे व दर वजनासह या सोबत जोडावे व निविदा प्रपत्र जोडावे. |

निविदाधारकाची स्वाक्षरी : ..............................
निविदाधारकाचे संपुर्ण नाव : ............................
फर्मचे नाव व शिक्का : ..................................

## शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव

### निविदा प्रपत्र

मी श्री/श्रीमती : ..........................................................................................................

फर्मचे नाव : ............................................... ................................................... आपणास विनंतीपुर्वक अर्ज करु इच्छितो / इच्छिते की,

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या संस्थेच्या अधिपत्याखालील खाली नमुद उपहारगृह व भोजनालयासाठी अकरा महिन्यांच्या करार कालावधीसाठी भाडेतत्त्वावर चालविण्यासाठी खालील प्रमाणे निविदा सादर करीत आहे. ( सदरील निविदा प्रपत्र लिफाफा क्र.२ मध्ये जोडावा. )

| अ.क्र. | उपहारगृह व भोजनालयाचे नाव | सदरील निविदा कोणत्या उपहारगृहासाठी सादर करीत आहे, त्याबाबतचा अचूक पर्याय निवडावा. |
|---|---|---|
| १ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील महाविद्यालय उपहारगृह व भोजनालय | |
| २ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | |
| ३ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थीनी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | |

१. नाव :

२. सध्याचा पत्ता :

३. कायमचा पत्ता :

४. सध्या करीत असलेला व्यवसाय :

५. आपणास ओळखत असलेल्या दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे नाव व स्वाक्षरी

अ) संपुर्ण नाव : ..........................................................

पत्ता : ..................................................................

....... ...........................................................

स्वाक्षरी :............................................................

ब ) संपुर्ण नाव : ..........................................................

पत्ता :................................................................

स्वाक्षरी :............................................................

( शिक्क्याची सही स्विकारली जाणार नाही )

६. दरपत्रक सूची सोबत जोडली आहे किंवा कसे ? :    होय  /  नाही

मी असे लिहुन देतो / देते की, आपल्या परिशिष्ट अ मधील सर्व अटी व शर्ती मी वाचलेल्या आहेत, तसेच त्या मला मान्य आहे.

आपला विश्वासू,

निविदाधारकाची स्वाक्षरी : ................................

निविदाधारकाचे संपुर्ण नाव : ............................

फर्मचे नाव व शिक्का : ...................................

( विद्यार्थी संघटना/ कामगार संघटना किंवा योग्य व्यक्ती / संस्था यांच्या लेटरहेडवर द्यावयाचे हमीपत्र )

**<u>उपहारगृह व भोजनालय पाणी व वीज वापरापोटी दरमहा भरावयाचे भाडे</u>**

मी श्री./श्रीमती........................................................................ फर्मचे नाव : ...............................
............................... आपणास विनंतीपुर्वक सादर करु इच्छितो / इच्छिते की, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव या संस्थेच्या अधिपत्याखालील खाली नमुद उपहारगृह व भोजनालय चालविण्यासाठी निविदा सादर करीत आहे.

| अ.क्र. | उपहारगृह व भोजनालयाचे नाव | सदरील निविदा कोणत्या उपहारगृहासाठी सादर करीत आहे, त्याबाबतचा अचूक पर्याय निवडावा. |
|---|---|---|
| १ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव येथील महाविद्यालय उपहारगृह व भोजनालय | |
| २ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | |
| ३ | शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय विद्यार्थीनी वसतिगृह, जळगाव येथील उपहारगृह व भोजनालय | |

पाणी वापरापोटीचे दरमहा भाडे रुपये ५००/- ( अक्षरी रुपये पाचशे फक्त )

वीज वापरापोटीचे दरमहा भाडे विद्युत सबमीटरप्रमाणे ( म.रा.वि.वि.कंपनी यांच्या प्रतियुनिट दराप्रमाणे ) किंवा रुपये ७००/- जे अधिक असेल ते.

करिता मी असे लिहून देतो / देते की, वरीलप्रमाणे मी लिहून दिलेले दरमहाचे भाडे किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवून दिलेले भाडे यापैकी जे अधिक असेल ते मी दरमहा कार्यालयाच्या रोखा शाखेत दर महिन्याच्या ७ तारखेपुर्वी भरण्यास बांधील राहिल. दरमहाचे भाडे थकल्यास किंवा न भरल्यास मा.अधिष्ठाता किंवा त्यांचे प्रतिनिधी उपहारगृह व भोजनालय तात्काळ बंद करतील याची मला जाणीव आहे.

निविदाधारकाची स्वाक्षरी : ...............................

निविदाधारकाचे संपुर्ण नाव : .............................

फर्मचे नाव व शिक्का : ...................................

( विद्यार्थी संघटना/ कामगार संघटना किंवा योग्य व्यक्ती / संस्था / ठेकेदार यांच्या लेटरहेडवर द्यावयाचे दरपत्रक )

**उपहारगृह व भोजनालयात पुरविण्यात येणाऱ्या खाद्यपदार्थांचे दर खालीलप्रमाणे**

**दरसूची**

| अ.क्र. | खाद्यपदार्थांचे नाव | दर ( रुपये ) |
|---|---|---|
| १ | चहा साधा ( ७५ मिली ) | |
| २ | चहा स्पेशल ( ७५ मिली ) | |
| ३ | कॉफी ( ७५ मिली ) | |
| ४ | गरम दुध साखरेसह ( ७५ मिली ) | |
| ५ | पोहे ( १०० ग्रॅम ) | |
| ६ | उपमा ( २०० ग्रॅम ) | |
| ७ | इडली ( २ नग ) सांबरसह | |
| ८ | आलुपराठा ( १ नग ) ( १५० ग्रॅम ) | |
| ९ | शिरा ( २०० ग्रॅम ) | |
| १० | बटाटेवडा ( १ वडा व २ पाव ) | |
| ११ | अंडा आम्लेट ( १ अंडी व २ ब्रेड ) | |
| १२ | उपवासाची खिचडी ( २०० ग्रॅम ) | |
| १३ | साबुदाना वडा ( २ नग ) | |
| १४ | पुरीभाजी ( १ भाजी व ५ पुऱ्या ) | |
| १५ | मेदूवडा सांबरसह ( २ नग ) | |
| १६ | दहीवडा ( २ नग ) | |
| १७ | मिसळ पाव ( २ पाव व २०० ग्रॅम मिसळ ) | |
| १८ | भोजनाचा एक वेळेचा दर ( प्रतिथाळी )<br>( ३ चपाती, भात, वरण, १ सुकी भाजी, १ पातळ भाजी, सलाड किंवा दही, पापड किंवा चटणी, कांदा, लिंबु ) | |
| १९ | भोजनाचा मासिक दर ( दोन वेळचे पोटभर जेवण )<br>( मासिक सभासदत्व घेणाऱ्यांसाठी ) | |

निविदाधारकाची स्वाक्षरी : ................................

निविदाधारकाचे संपुर्ण नाव : ............................

फर्मचे नाव व शिक्का : ...................................